# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग
### संत गाडगे बाबा कमवा आणि शिका या योजनेचे सुधारित विनियम

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील ५(४०) (एच) ५५(१) आणि ५५(२)(सी) मधील अधिकार व कर्तव्याचे प्राधानानुसार विद्यापीठाची उद्दीष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असेल असे सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्या दृष्टिने आखण्यात आलेले कोणतेही इतर कार्यक्रम, सेवा किंवा उपक्रम यामध्ये सहभागी करण्याची तरतूद उपलब्ध होती

आणि;

ज्याअर्थी, विद्यापीठीय शिक्षणाच्या उद्दीष्टांमध्ये विद्यार्थ्याला अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढ्यापुरते मर्यादित न ठेवता त्याला समाजपयोगी सुसंस्कृत नागरिक घडविणे हे शिक्षणाच्या अनेक उद्दीष्टांपैकी एक प्रमुख उद्दीष्ट आहे

आणि;

ज्याअर्थी, विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगिण विकास केवळ पुस्तकी वा बौध्दिक शिक्षणाने होवू शकणार नाही. किंबहूना, व्यक्तीमत्वाचा विकास हा शरीर, मन, बुध्दी आणी आत्मा या सर्वांच्या संतुलनातून खऱ्या अर्थाने विकसित होतो. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुनच उच्च शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांमध्ये श्रम संस्कार व श्रम भावना वृध्दींगत व्हावी व पर्यायाने विद्यार्थ्याने अर्थार्जन करुन पालकांना व कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासमवेत स्वतःचे श्रमदानाच्या प्राप्त अर्थार्जनातून आवश्यक शिक्षण मिळविण्याचा प्रयत्न करावा ही उद्दीष्टे समोर असून "कमवा आणि शिका योजना" सुरू केल्याने प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल

आणि;

ज्याअर्थी, सदर योजना विद्यापीठाद्वारे कार्यान्वीत केल्यास विद्यापीठामध्ये अस्तित्वात असलेल्या अल्प मनुष्यबळावर निर्माण झालेला अतिरिक्त प्रशासकीय कार्यभार कमी होवून विद्यापीठ नियमित कर्मचाऱ्यांना कार्य त्वरेने संपादन करण्यात सहयोग होवू शकेल व पर्यायाने विद्यापीठाचे प्रशासकीय कामकाज गतीमान करण्याचे उद्दीष्ट सफल होवू शकेल.

आणि;

ज्याअर्थी, दिनांक ०२.०८.२०१४ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेने विषय क्रमांक १६६ अन्वये "कमवा आणि शिका" योजनेचे प्रारुप नियम तयार करण्यास मान्यता प्रदान केली होती

आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा कलम ५५(२) सी मधील तरतूदींतर्गत प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन व्यवस्थापन परिषदेने नियम क्रमांक ०३/२०१५ अन्वये नियम तयार करण्यात आले असून गुरूवार दिनांक १६ जुलै, २०१५ अन्वये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे राजपत्र भाग क्रमांक १ मध्ये पृष्ठ क्रमांक ८४ ते पृष्ठ क्रमांक ८८ अन्वये प्रसिध्द करण्यात आले होते

आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ५६ नुसार विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकार व कर्तव्ये अशी तरतूद आहे

आणि;

ज्याअर्थी, संत गाडगे बाबा कमवा आणि शिका योजनेचे विनियमामध्ये अतिरिक्त बाबी समाविष्ट व बदल करण्याकरीता विद्यार्थी विकास मंडळाचे दिनांक २७.१०.२०२० रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये विषय क्रमांक ३१ नुसार सादर करण्यात आला होता

आणि;

ज्याअर्थी, सदर विषयानुसार विद्यार्थी विकास मंडळ सभेने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**अ)** संत गाडगे बाबा कमवा आणि शिका योजना विनियमावलीचा सभेमध्ये सखोल विचार विनिमय करण्यात येवून विनियमातील बाब क्र.**१५) कामाचा कालावधी** यामध्ये खालीलप्रमाणे असलेल्या तरतुदीमध्ये पुढील प्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात आली.

विनियमामध्ये असलेली बाब क्र.१५ खालीलप्रमाणे.

**'सदर योजनेमध्ये निवड होणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीला प्रति दिन निर्धारीत वेळेमध्ये अधिकतम चार (०४) तार कार्ये करता येईल. सदर कलमांतर्गत प्राचार्यांद्वारे महाविद्यालयातील शैक्षणिक निर्धारीत तास वगळून विद्यार्थ्यांना कार्ये करता येईल.'**

विनियमामध्ये दुरुस्ती करण्यात आलेली बाब क्र.१५ खालीलप्रमाणे.

**सदर योजनेमध्ये निवड होणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीला प्रति दिन अधिकतम चार (०४) तास कार्ये करता येईल.**

**ब)** तसेच मुद्दा क्र.**१९) श्रम मोबदला दर व हजेरी पुस्तक यामध्ये विद्यार्थ्याला श्रमदानापोटी श्रम मोबदला म्हणून प्रति तास रु.३०/- (अक्षरी रुपये तीस फक्त) ऐवजी रु.५०/- (अक्षरी रुपये पन्नास फक्त)** शोधन करण्यात यावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**क)** तसेच ही योजना वर्षभर राबविण्यासाठी सभेमध्ये विचार विनिमय करण्यात आला. ही योजना सद्यःस्थितीमध्ये माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर ते माहे मार्च पर्यंत राबविण्यात येत आहे. परंतु विद्यापीठामध्ये उपलब्ध असलेले अत्यल्प मनुष्यबळ लक्षात घेता व विद्यार्थ्यांना परिक्षा संपल्यानंतर कार्य करता यावे याकरीता सदर योजना ही वर्षभर राबविण्यात यावी असे सुध्दा ठरविण्यात आले होते.

**ड)** याकरीता मुद्दा क्र.**२०) योजनेचा कालावधी** यामध्ये योजना सुरु होतांना जे विद्यार्थी विद्यापीठ शैक्षणिक विभागांमध्ये प्रथम वर्षाकरीता तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी जे स्नातक पदवी परिक्षेच्या प्रथम व द्वितीय वर्षामध्ये व पदव्युत्तर पदवी परिक्षेच्या प्रथम वर्षाकरीता प्रवेशित आहेत अशाच विद्यार्थ्यांना माहे मार्च नंतर प्राधान्य देण्यात येवून त्यांना माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर ते माहे सप्टेंबर पर्यंत कार्यरत ठेवण्यात यावे अशी दुरुस्ती विनियमामध्ये करण्यात येवून सुधारीत विनियम पुढील सभेपुढे मान्यतेकरीता सादर करण्यात यावे असे ठरविण्यात आले होते.

आणि;

ज्याअर्थी, दिनांक २७.१०.२०२० रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये विषय क्रमांक ३१ नुसार मान्यता प्रदान झाल्यानुसार सदर विषय दिनांक २७.१०.२०२० रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये विषय क्रमांक ४६ नुसार सादर करण्यात येवून सभेमध्ये "संत गाडगे बाबा कमवा व शिका योजना" प्रारुप विनियमावलीस मान्यता प्रदान करण्यात आली.

आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ मधील तरतूद क्रमांक ३७(१) मधील (द) नुसार सादर करण्यात येवून व्यवस्थापन परिषदेसमोर मान्यता प्राप्त करण्याकरीता सादर करण्यात यावे अशी सर्वानुमते शिफारस करण्यात आली.

आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ३७(१) मधील (द) नुसार विनियम प्रारुपास व्यवस्थापन परिषदेस मान्यतेस सादर करण्याकरीता सर्वाधिकार अधिष्ठाता मंडळास बहाल करण्यात आले.

आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ७५ अंतर्गत व्यवस्थापन परिषद विनियम करतील अशी तरतूद आहे

आणि;

**त्याअर्थी, व्यवस्थापन परिषद पुढील प्रमाणे सुधारित विनियम विहित करीत आहे.**

**१) योजनेचे नांव** -

या विनियमांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संत गाडगे बाबा कमवा व शिका योजना या नावाने संबोधले जाईल.

**२) योजनेची अंमलबजावणी** -

सदर विनियम व्यवस्थापन परिषदेने मान्यता प्रदान केल्याचे तारखेपासून अंमलात येतील.

**३) व्याख्या** -

या विनियमांमधील उपयोगात आणल्या जाणाऱ्या शब्दांच्या व्याख्या खालीलप्रमाणे राहतील. विद्यार्थी म्हणजे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या स्थानिक महाविद्यालय/संस्था/पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग/घटक महाविद्यालय/स्वायत्त महाविद्यालय येथे नियमितरित्या पदवी पदविका, पद्व्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेशित असलेला विद्यार्थी/विद्यार्थीनी.

**४) उद्दिष्टे :** या योजनेची उद्दीष्टे खालीलप्रमाणे राहतील.

अ) आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू आणि होतकरु विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण संपादन करण्यासाठी श्रमाच्या मोबदल्यामध्ये प्राधिकारिणीद्वारे निर्धारित श्रम मोबदला प्रदान करणे.

ब) मानवी श्रमाची प्रतिष्ठा जोपासणे.

क) ज्ञानसेवक निर्माण करणे.

ड) स्वयंरोजगार प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे.

ई) विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कृतीची जाणीव निर्माण करणे.

**५) पात्रता :**

सदर योजनेचा लाभ हा जे विद्यार्थी अथवा विद्यार्थीनी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या स्थानिक महाविद्यालये/संस्था/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/घटक महाविद्यालय/स्वायत्त महाविद्यालय येथे नियमितरित्या पदवी, पदविका, पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेशित असतील त्यांना निर्धारीत पध्दतींचा अवलंब करुन घेता येईल.

**६) अर्जाचा नमुना व सादर करावयाची तिथी :**

सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना परिशिष्ट **'अ'** नुसार अर्ज संचालक, विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नांवे संबंधित प्राचार्यांच्या मार्फत प्रतिवर्षी दिनांक ३१ ऑगस्ट पुर्वी सादर करणे अनिवार्य राहील. उपरोक्त नमूद तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. परंतु अपवादात्मक परिस्थितीमध्ये कुलगुरूंचे अनुमतीने प्राचार्यांमार्फत इच्छुक उमेदवारांचे अर्ज बोलाविणे अथवा स्विकारणे याचे अधिकार संचालक, विद्यार्थी विकास यांना राहतील.

**७) माहितीचे प्रकाशन :**

सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता प्रतिवर्षी संचालक, विद्यार्थी विकास यांचे कार्यालयामार्फत विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळावर सदर योजनेसंबंधीची माहिती माहे सप्टेंबरच्या चवथ्या आठवड्यात प्रकाशित करण्यात येईल.

**८) समिती व कालावधी :**

परिच्छेद क्रमांक ६ मध्ये नमुद दिनांकानुसार प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी कुलगुरूंद्वारे/विद्यार्थी विकास मंडळाद्वारे नामित करण्यात येणाऱ्या त्रिसदस्यीय समितीद्वारे करण्यात येईल. सदर समितीमध्ये

विद्यापीठातील कार्यरत अधिकाऱ्यांचा समावेश राहील व समितीचा कार्यकाल हा कुलगुरूंनी नामित केल्याच्या दिनांकापासून त्या शैक्षणिक सत्रासाठी राहील किंवा पुढील समितीचे गठन होईपर्यंतचा राहील.

**९) प्रतिक्षा यादी :**

आवश्यकतेपेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास परिच्छेद ८ नुसार गठीत समितीद्वारे विद्यार्थ्यांची निवड मुलाखतीद्वारे करण्यात येईल. तसेच निवड यादीमध्ये त्रिसदस्यीय समितीद्वारे प्रतिक्षा यादी देखील तयार केली जाईल. सदर यादी विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात येईल तसेच संबंधीत महाविद्यालयांच्या प्राचार्यामार्फत विद्यार्थ्यांना कळविण्यात येईल.

**१०) निर्णयाधिकार :**

सदर निवडीबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना निर्णय देण्याचे अधिकार राहतील. अपिलिय अधिकारी म्हणून मा.कुलगुरू राहतील.

**११) यादी संग्रहण :**

सदर योजनेमध्ये निवड करण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी संचालक, विद्यार्थी विकास यांचे विभागामध्ये संग्रहित करण्यात येईल.

**१२) कामाचे स्वरुप :**

सदर योजनेमध्ये निवडण्यात येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीला संभाव्यतः खालील कामे सोपविली जातील.

| **अ) प्रशासकीय कार्ये** | **ब) तांत्रिक कार्ये** | **क) क्षेत्रिय कार्ये** |
|---|---|---|

**१३) विभागणी :**

या योजनेंतर्गत विद्यापीठाशी संलग्नित असलेले महाविद्यालयातील व विद्यापीठाचे शैक्षणिक विभागांमध्ये प्रवेशित असलेले विद्यार्थी अशी विभागणी करण्यात आलेली आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी हे महाविद्यालयामध्येच तर विद्यापीठाचे शैक्षणिक विभागातील विद्यार्थी हे विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागामध्ये उपरोक्त अ.क्र.१२ मध्ये नमुद कार्ये करतील.

**१४) श्रम मोबदल्याकरीता मनुष्यबळ :**

श्रम मोबदल्याकरीता लागणारे मनुष्यबळ साधारणतः प्रती महाविद्यालयास ५ विद्यार्थी व विद्यापीठातील विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागाकरीता आवश्यकतेनुसार प्रती वर्ष नेमावे. तसेच सदर योजनेंतर्गत अर्ज प्राप्तीनंतर मनुष्यबळ संख्या ठरविण्याचे अधिकार हे संचालक, विद्यार्थी विकास यांना मा.कुलगुरूचे अनुमतीनुसार राहतील.

**१५) कामाचा कालावधी :**

सदर योजनेमध्ये निवड होणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीला प्रति दिन अधिकतम **चार (०४) तास कार्य** करता येईल.

**१६) सुटी काम मोबदला :**

निर्धारीत शासकीय/स्थानिक जाहीर करण्यात आलेल्या सुटी कालावधीमध्ये विद्यार्थी/विद्यार्थीनींची निवड ज्या विभागामध्ये कार्य करण्याकरीता झालेली असेल, व सदर कार्यालय बंद राहणार असल्यास त्या दिवशीचा श्रम मोबदला सदर विद्यार्थ्याला देण्यात येणार नाही. तथापि, सदर कार्यालय मात्र सुटीच्या दिवसांमध्ये देखिल सुरु राहणार असल्यास व सदर विद्यार्थी/विद्यार्थीनीस त्या दिवशीचे कार्यालयीन काम सोपविण्यात आल्यास त्याचा श्रम मोबदला त्याला/तिला संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांनी प्रमाणित केल्यानुसार दिला जाईल. याकरीता सदर विभागाच्या विभाग प्रमुख/अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**१७) श्रम मोबदला देयके शिफारशीचे अधिकार :**

श्रम मोबदला प्रदान करण्याकरीता परिशिष्ट **'ब'** नुसार देयके संबंधीत विभागप्रमुखांचे शिफारशीनंतर संचालक, विद्यार्थी विकास यांचे विभागास प्राप्त झाल्यानंतर शोधनाचे कार्यवाहीस्तव विद्यार्थी विकास विभागामार्फत वित्त विभागाकडे अग्रेषित केली जातील.

**१८) श्रम मोबदला :**

सदर याजनेंतर्गत संलग्नित महाविद्यालयातील कामे करणाऱ्या विद्यार्थ्यांना श्रम मोबदला शोधन करण्याकरीता श्रम मोबदला एकुण लागणाऱ्या मनुष्यबळाच्या ७० % विद्यापीठ व ३० % संबंधित महाविद्यालये

याप्रमाणात वहन करण्यात येईल. तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभागातील कामे करणाऱ्या विद्यार्थ्यांना श्रम मोबदला शोधन करण्याकरीता श्रम मोबदला हा १००% टक्के विद्यापीठाद्वारे प्रदान करण्यात येईल.

संबंधित महाविद्यालयांकडून प्रति विद्यार्थी ३०% रक्कम विद्यापीठ खाती जमा झाल्यानंतरच व जमा करण्यात आलेल्या रकमेची पावती संचालक, विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे कार्यालयात दि. ३० सप्टेंबर पूर्वी किंवा पर्यंत सादर केल्यानंतरच संबंधित महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची देयके मंजुर करण्यात येईल. ज्या महाविद्यालयाने श्रम मोबदल्याची ३०% राशी नाकारली असेल अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या देयकांची राशी शोधन करण्यात येणार नाही.

संबंधित महाविद्यालयांनी ३०% राशी विद्यापीठ खाती जमा केल्यानंतरच ७०% राशी विद्यापीठाचे अंदाजपत्रकातील विद्यार्थी विकास निधी मधिल **"संत गाडगे बाबा कमवा आणि शिका"** या व्ययशिर्षातून ७०% मानधन हे संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता तर १००% मानधन हे विद्यापीठाचे शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांना श्रम मोबदला म्हणून प्रदान करण्यात येईल.

**१९) श्रम मोबदला दर व हजेरी पुस्तक :**
निवडण्यात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला तो करीत असलेल्या श्रमदानापोटी **प्रति तास रु.४०/-** प्रमाणे देण्याची शिफारस करण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांच्या ७५% उपस्थितीचे प्रमाणपत्र प्राचार्यांच्या मार्फत देणे बंधनकारक असेल. त्याशिवाय त्यांच्या देयकांच्या शोधनाची शिफारस केली जाणार नाही.

**२०) योजनेचा कालावधी (माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर ते पुढील शैक्षणिक वर्षाचे माहे सप्टेंबर पर्यंत):**
**सदर योजनेमध्ये विद्यार्थ्यांना परिक्षा संपल्यानंतर कार्य करता यावे, याकरीता ही योजना वर्षभर राबविण्यात यावी, याकरीता योजना सुरु होतांना जे विद्यार्थी विद्यापीठ शैक्षणिक विभागांमध्ये प्रथम वर्षामध्ये तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी जे स्नातक पदवी परिक्षेच्या प्रथम व द्वितीय वर्षामध्ये व पदव्युत्तर पदवी परिक्षेच्या प्रथम वर्षाकरीता प्रवेशित आहेत अशाच विद्यार्थ्यांना माहे मार्च नंतर प्राधान्य देण्यात येवून त्यांना चालू शैक्षणिक वर्षातील माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर ते पुढील शैक्षणिक वर्षाचे माहे सप्टेंबर पर्यंत कार्यरत ठेवता येईल.**

**२१) बँक खाते :**
विद्यार्थ्याला प्रदान करावयाचा मोबदला विद्यार्थ्याचे रुजू होतेवेळी विद्यार्थ्याने सादर केलेल्या अर्जात नोंदविलेल्या त्याचे स्वतःचे नावे असलेल्या बॅंक खात्यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता वर्षाच्या अखेरीस किंवा वर्षातुन दोनदा व विद्यापीठातील विद्यार्थ्यांकरीता महिन्याचे अखेरीस वित्त विभागामार्फत जमा केला जाईल.

**२२) अनुशासन व तक्रार निवारण :**
निवड झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्याने गैरवर्तन, असभ्य वागणूक अथवा कोणत्याही गोपनीयतेचा भंग केल्यास आणि तशा आशयाची लेखी तक्रार संबंधित विभाग प्रमुखामार्फत रितसर प्राप्त झाल्यानंतर त्याची शहानिशा मा.कुलगुरू महोदयांद्वारे गठीत करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीमार्फत केली जाईल. तक्रारीमध्ये तथ्यांश आढळून आल्यास सदर विद्यार्थी हा अस्तित्वात असलेल्या नियमानुसार शिक्षेस पात्र असेल. तथापि, असे विद्यार्थी/विद्यार्थीनी व त्याने केलेले सदर कृत्य ज्या स्वरुपाचे असेल त्याप्रमाणे कार्यवाहीचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार कुलसचिवांना राहतील.

**२३) पालकांचे संमतीपत्र :**
सदर योजनेतंर्गत निवडण्यात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी / विद्यार्थीनीस परिशिष्ट '**क**' नुसार पालकांचे संमतीपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

**२४) विद्यापीठ/महाविद्यालय चल, अचल मालमत्ता व इतर गोपनीय कागदपत्रे :**
निवड होणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस वैयक्तिक कामाकरीता विद्यापीठ/महाविद्यालयाच्या चल अचल मालमत्तेचा उपयोग करता येणार नाही. तसेच कोणत्याही प्रकारची वस्तु/सुविधा/दस्तऐवज यांचा वापर संबंधित विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या पुर्व अनुमतीशिवाय करता येणार नाही. असे आढळल्यास सदर विद्यार्थी / विद्यार्थीनी हे उपरोक्त परिच्छेद क्र. २२ मधील तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र ठरतील.

**२५) विद्यार्थ्याने केलेल्या कार्याचा अहवाल :**
या योजनेंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्याने संबंधित महाविद्यालयात केलेल्या कार्याचा अहवाल प्राचार्यांद्वारे संचालक, विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे कार्यालयात वर्षाचे शेवटी पाठविणे अनिवार्य राहील.

**************